I J R S S I S, Vol. VI, Issue (1), January 2018 : 300-303 ISSN 2347 – 8268

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

# कर्जबाजारी शेतकरी आणि शासनाची भूमीका

**डॉ. किशोर एच. धोटे**
सहयोगी प्राद्यापक, अर्थशास्त्र विभाग,
धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर

**सारांश** : जागतिकीकरण, उदारिकरण यातून उदयास आलेल्या W.T.O. करारातून भारतात बहुराष्ट्रीय कंपन्यांचा प्रवेश झाला आणि याचाच परिणाम भारतीय कृषी क्षेत्रावर झाला. अर्थात राष्ट्रसंघाने तयार केलेल्या आसार संहितेनुसार भारतीय कृषी क्षेत्राला पोषक ठरेल असेच धोरण त्यात नमूद होते. बहुराष्ट्रीय कंपन्यांनी स्थानिक लोकांना रोजगार निर्माण करतील जो भारतीय कृषी ला पौषक ठरणारा होता. या सारख्या बऱ्याच बाबी या करारात समाविष्ट होत्या परंतू या कंपन्यांनी मात्र आचार संहितेचे पालन केले नाही. सन १९९१ पर्यंत जो भारतीय शेतकरी बियाण्यांची साठवणूक करीत होता. त्यावरही बंदी तर आणलीच, शिवाय श ेतकऱ्यांना प्रत्योक वर्षी बियाणे खरेदीसाठी शासनाकडून मिळणारे अनुदानही बंद केले आणि बियाण्यांच्या किमतीही वाढविल्या १९९१ मध्ये ज्या बियाण्यांसाठी प्रती एकरी रू. ७०/— खर्च येत होता तो आज १०००/— रू. च्या वर येत आहे. आणि बी. टी. कॉटन बियाण्यांच्या किमतीत ४० प्रतिशत ने वाढ झालेली आहे. हा सर्व परिणाम जून १९९१ मध्ये नरसिंहराव सरकारने नवीन आर्थिक धोरण जाहीर करून आर्थिक उदारीकरणाची प्रक्रिया स्विकारली त्यामुळे कृषीक्षेत्रातील अनावश्यक बंधने आणि किंमतीवरील नियंत्रणे कढून टाकली.

---

प्रस्तावना :

भारतीय शेतकरी 'कर्जात जन्मतो, कर्जात जगतो आणि कर्जातच मरतो', याचे मुळ पतधोरणाच्या योजनात आहे. सामान्य शेतकऱ्यांना उपलब्ध वित संस्थेमार्फत वित सहाय्यक मिळत नाही आणि जेथे मिळते त्या संस्थेत कागद पत्राची मोठी यादी आणि कर्ज मिळविण्यासाठी गुंतागुंतीची प्रकिया व संबंधित कार्यालयापर्यंत रोजची पायपीट करावी लागते. त्यामुळ शेतकऱ्यांना बाह्य पतपुरवठा (सावकार) घटकांवर अवलंबून राहावे लागते. तेंव्हा पर्याय म्हणून सावकार वर्गाकडून अवाजवी दराने कर्ज घेतात.

भारतातील महाराष्ट्रात शेतकऱ्यांनी बी. टी. कापूस बियाणांचा वापर केल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या दिसून येतात. कारण बी. टी. कापूस बियाणे हे इतर जातीच्या कापूस बियाण्यांपेंक्षा आधिक उत्पादन देणारे आहे. कारण या कापसाच्या बोंडात होणारे किडे मारण्याची क्षमता आहे. परंतु हे बियाणे अत्यंत महाग असून त्यासाठी सावकाराकडूॅन कर्ज घेतात आणि पाणी पुरवठ्याच्या अपूऱ्या सोयीमुळे हे बियाणे वापरून कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांचे पीक बुडाल्यामुळे ते आणखीनच कर्जबाजारी होतात आणि कर्जबाजारी झालेले शेतकरी वैफल्यग्रस्त होऊन आत्महत्या करतात.

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

महाराष्ट्रातील ५५ प्रतिशत शेतकरी आजही कर्जाच्या बोझ्याखाली जीवन जगत आहेत. तर काहींना हे जीवन जगणे अशक्य झाल्यामुळे आत्महत्येचा मार्ग पत्करतात.

१९९७ ते २००१ या काळात राष्ट्रीय पातळीवरील आत्महत्यांची सरासरी १५,७४७ होती, तर २००२ ते २००७ मध्ये हेच प्रमाण सरासरी १७,३६६ वर जावून पोहचली. एका दिवसाला कर्जबाराजीला कंटाळून आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची सरासरी ४६ होती तर दर अर्ध्या तासाला एक शेतकरी देशात आत्महत्येला बळी पडत आहेत.

- **शासनाची भूमीका**

भारत सरकार कृषी क्षेत्राच्या विकासाकरिता तत्पर आहे व याचाच परिणाम की, शासनातर्फे कृषी क्षेत्राच्या विकासाकरिता महत्वाची भूमिका दिसून येते. अर्थात शेतकरी कर्जबाजारी होऊन आत्महत्या करू नये किंवा हे आत्महत्येचे सत्र थांबविण्याकरिता अनेक महत्वपूर्ण योजना राबवित आहेत त्या पूढील प्रमाणे.

- **अल्प व्याजदरावर कर्ज :**

कर्जबाजारीपणा ही शेतकऱ्यांची एक महत्वपूर्ण समस्या आहे. शासकीय बॅंकाकडून पुरेसा पत पुरवठा न होवू शकल्याने असंघटीत क्षेत्राकडून कर्ज घ्यावे लागते. परिणामी बऱ्याच शेतकऱ्यांना आपलया भूमिलाही मुकावे लागते. याकरिता सरकारने इ.स. २००४ पासून ६ ते ७ प्रतिशत दराने कर्ज पुरवठा उपलब्ध करून दिला. २००४—०५ मध्ये १,४५,२४२/— कोटी तर इ. स. २००८—०९ मध्ये २,४५,०००/— कोटी रूप्ये कर्ज शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिले, तर चाली वित्तीय वर्षात २,८०,०००/— कोटी रूपयांपर्यंत वाढविण्याचे लक्ष निर्धारित केले आहे.

- **राष्ट्रीय कृषी विमा योजना :**

इ. स. १९८५ मध्ये भारत सरकारने पीक विमा योजना सुरू केली तर इ. स. १९९९—२००० पासून दुष्काळ, पुर, कीड इत्यादी नैसर्गिक आपत्तीपासून शेकऱ्यांच्या रक्षणासाठी व्यापक राष्ट्रीय कृषी विमा योजना सुरू केली यात सर्वच शेतकरी व सर्वच पिकांचा समावेश करण्यात आला.

- **राष्ट्रीय बिज योजना :**

च्या अटीला अनुसरून जून २००२ मध्ये नविन राष्ट्रीय बीज धोरण आखण्यात आले. यानुसार बियाने उद्योगांमध्ये गुंतवणूक वाढविली आणि बौध्दिक संपदा अधिकाऱ्यांच्या तरतुदीला अनुसरून बियाण्यांची आयात केली जाईल.

- **नवीन राष्ट्रीय कृषी धोरण :**

कृषी क्षेत्राचा दरवर्षी ४ प्रतिशत दराने विकास करणे, त्याच बरोबर देशांतर्गत मागणी पूर्ण करून

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

निर्याताधिक्य उत्पादन करण्याच्या उद्देशाने २८ जुलै २००८ मध्ये नवीन

राष्ट्रीय धोरण आखण्यात आले. या धोरणांतर्गत कृषी उत्पादनाच्या व्यापारावरील प्रतिबंध रद्द करणे व कृषी संबंधित हरित क्रांती, निलक्रंती, पितक्रांती या सर्व एकत्रित करून इंद्रधनु य क्रांती आखण्याचा संकल्प केला.

- **राष्ट्रीय बागायती मिशन :**

शेतकऱ्यांना बागायती शेतीकरिता प्रोत्साहित करणे त्यांच्या उत्पादनाला योग्य मूल्य व निर्यात व्यवस्था उपलब्ध करून देण्याच्या हेतूने इ. स. २००५ पासून राष्ट्रीय बागायती मिशन सुरू करण्यात आले.

- **किसान कॉल सेंटर :**

देशांतर्गत सर्व शेतकऱ्यांना शेती संबंधी आवश्यक माहिती देणे, मार्गदर्शन करण्याच्या हेतूने २१ जानेवारी २००४ पासून किसान कॉल सें टर नामक योजना सुरू केली. या अंतर्गत देशातील २८ कॉल सेंटरवरून १५५१ या टोल फ्री क्रमांकावरून सकाळी ८ ते रात्री १० पर्यंत इंग्रजी, हिंदी व स्थानिक भागांमधून आवश्यक माहिती व मार्गदर्शन उपलब्ध करून दिले.

- **किसान क्रेडीट कार्ड :**

शेतकऱ्याला कर्ज उपलब्धीच्या हेतूने ऑगष्ट १९९८ पासून ही योजना सुरू केली. या योजनेची कार्यवाही २७ वाणिज्य बॅंका, ३६८ सहकारी बॅंका, १९६ क्षेत्रीय ग्रामीण बॅंकाच्या माध्यमातून केल्या जात आहे.

- **कर्जमाफी :**

केंद्र सरकारने इ. स. २००८—२००९ च्या अंदाजपत्रकामध्ये ६०,००० कोटी रूपये कर्ज माफ केले.तसेच पुढील वर्षात २३६ समस्या ग्रस्त जिल्ह्यातील मोठ्या शेतकऱ्यांनाही कर्जमाफी दिली. ही रक्कम ७१,६०० कोटीच्या वर गेली आणि ३० जुलै पर्यंत ही प्रक्रिया पूर्ण झाली.

- **राष्ट्रीय शेतकरी आयोग :**

शेती क्षेत्रामध्ये गुंतवणूक वाढविणे, शेतीच्या विकासाला प्रोत्साहन देणे, शेतातील विविध समस्यांच्या अध्ययनाकरिता इ. स. २००४ ला डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय शेतकरी आयोग स्थापन केला.

**निष्कर्ष :**

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषी प्रधान आहे. ६५ प्रतिशत शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचे कृषी हे एक साधन आहे आणि या कृषी पासून मिळणाऱ्या उत्पादनात उत्पन्नाच्या तुलनेत खर्चात वाढ होत असल्यामुळे आज शेतकरी कर्जबाजारी झाला आणि कर्जबाजारीतून स्वत:ची सुटका करण्यासाठी आत्महत्येला किंवा मृत्यूला आलिंगण देतात. परंतु या कर्जबाजारात शासनाची भूमिका महत्वाची आहे. कारण २००१

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES

© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)

www.vmsindia.org

पासून सतात आत्महत्येचे सत्र सतत सुरू आहे. हे सत्र थांबविण्यासाठी अनेक शासकाच्या योजना कार्यरत आहे. या योजनांच्या माध्यमातून अनुदान निधी हा शेतकऱ्यांना व त्यांच्या कुटुंबाला दिला जातो. त्याचेच प्रतिफळ म्हणून आज शेतकरी आत्महत्येचे प्रमाण कमी झालेले दिसून येते. उदा. २००६ मध्येच १५४ शेतकऱ्यांनी वर्धा जिल्ह्यात आत्महत्या केली तरी २०१३ मध्ये मात्र कर्जबाजारीमुळे आत्महत्या होण्याचे प्रमाण केवळ ७५ वरच आलेले आहेत अर्थात हा परिणाम शासनाच्या भूमिकेमुळेच झालेला दिसून येतो.

**संदर्भ सूची :**

१. लोकराज्य — सप्टेबर २००८

२. योजना मासिक — जाने. २०११

३. भारतीय अर्थव्यवस्था — जी. एन. झायरे

४. प्रतियोगिता दर्पन — २००९

५. कृषी विषयक घटक — के. सागर २००९

************